!! श्री !!

खासदार चंद्रकांत खैरे

शिवसेना उपनेते

जा.क्र. : खा.का.प्र.प ३४५/१८/०६/१५

प्रति,मा.श्री.संपादक साहेब,कृपया प्रसिद्धीसाठी

# हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब आय.ए.एस. ॲकडमी प्रवेशपूर्व परिक्षेस उत्स्फुर्त प्रतिसाद

## शहरासह जिल्ह्यातील ५०० विद्यार्थ्यांनी घेतला सहभाग

**संभाजीनगर : ( ता.२० )** शिवसेना व शिवविद्याप्रबोधिनी मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यातील १००० (एक हजार) विद्यार्थ्यांना मोफत प्रशिक्षण पूर्व परिक्षा शारदा मंदिर कन्या विद्यालयात १९ जुलै रोजी ११ ते १ दरम्यान घेण्यात आला. २०० मार्कच्या परिक्षेस उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांचा निकाल २७ जुलै रोजी तर २ ऑगस्ट पासुन प्रत्यक्ष शिकवण वर्गास सुरुवात होणार आहे. यावेळी शिवसेना नेते तथा परिवहन मंत्री दिवाकर रावते यांनी भेट देऊन परिक्षार्थांना शुभेच्छा दिल्या, तर शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांनी विद्यार्थ्यी नोंदणी फिस, परिक्षा व्यवस्था करुन विद्यार्थ्यांना दिलासा दिला.

अतिशय शांत व शिस्ममय वातावरणात पार पडलेल्या परिक्षेसाठी विद्यार्थ्यांसह विद्यार्थींतीने मोठा प्रतिसाद नोंदवत आयोजकांचे आभार मानले. येथील लोकसेवा आयोग महाराष्ट्र लोकसेवा यासारख्या स्पर्धा परिक्षा देणाऱ्या गरिब व गरजु विद्यार्थ्यांना खाजगी क्लासेस परवडत नाही. यामुळे दोन वर्षापासुन शिवसेनेच्या या उपक्रमास राज्यभरातुन प्रतिसाद मिळत आहे. शिवसेना भवन, श्री. शिवाई ट्रस्ट, औरंगपुरा येथे डॉ. मोहन जोशी यांनी गेल्या वर्षी २५ विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले. यावर्षी जवळपास २०० विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात येणार परिक्षेदरम्यान जिल्हाप्रमुख अंबादास दानवे, शहरप्रमुख राजु वैद्य यांनी भेट दिली तर युवासेना जिल्हाधिकारी तथा नगरसेवक ऋषिकेश खैरे, पंढरीनाथ गोंडे पाटील, डॉ. मोहन जोशी, विद्यापीठप्रमुख तुकाराम सराफ, शिवाजी बनकर, हर्षवर्धन त्रिभुवन, किरण गायकवाड, अक्षय कुंटे, आदित्य राजपुत आदिंची उपस्थिती होती.

प्रसिध्दी प्रमुख

गणेश वाघ / मनोज वडगावकर

कार्यालय : ''खैरे निवास'', वसंत भवन समोर, मच्छली खडक, संभाजीनगर-४३१ ००१. दुरध्वनी : ( ०२४० ) २३३११२५, २३३१२२५. फॅक्स : ( ०२४० ) २३४३०२५

cbkhaire@gmail.com , yp4329@gmail.com , ydp4329@gmail.com , procbkhaire@gmail.com ganeshwagh4400@gmail.com

8421415255/9420404329 8484066606/9604384400